## रे.मु.नं.१९९/१९९५ मधील नि.२२८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला असुन अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा अविभक्त हिंदु कुटूंबाचा असणा-या मिळकतीतील त्याचा हिस्सा ठरवुन मिळण्याकरिता दाखल केला आहे. दाव्यामध्ये वादीच्या बाजूने निकाल झाला मात्र त्याची अंमलबजावणी होण्यापुर्वीच प्रतिवादीने वरिष्ठ न्यायालयात निकालविरूध्द अपील दाखल केले. दरम्यान प्रतिवादींनी बेकायदेशीरपणे महसुल अधिकारी यांचेसमोर दावा मिळकतीचे वाटप करून घेतले त्यानंतर त्याआधारे प्रतिवादी क्र. २ याने दावा मिळकतीतील काही भाग ति-हाईत इसम शरद चंद्रभान गाडेकर यांस विक्री केला आहे. सबब दावा चालू असताना दावा मिळकतीचे हस्तांतरण झाले आहे. सबब सदर व्यवहाराची इत्यंभूत परिस्थिती दाव्यात दुरूस्ती करून अभिलेखावर आणणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार वादी यांनी विनंती केली आहे त्यांनी प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

२. प्रतिवादी क्र.२ आणि ३ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दिले आहे की, वादीचा अर्ज खोटा आहे. तसेच अर्जासोबत वादीने कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. सबब अर्ज रदद करण्यात यावा. प्रतिवादी क्र.४ अ ते ४ क तर्फे वादीच्या अर्जास म्हणणे देण्यात आले की, वादीचा अर्ज कायदेशीर नाही. वादी यास निश्चीत काय दुरूस्ती करायची याचा बोध अर्जावरून होत नाही. प्रतिवादी क्र.२ ने केलेल्या मिळकतीच्या हस्तांतरणाशी प्रतिवादी क्र.५ ते ७ यांा संबध येत नाही. प्रतिवादी क्र.२ ने त्याच्या ताब्यातील क्षेत्र गरजेकरिता कांडेकर यांना विक्री केले. वास्तविक प्रस्तुत दावा केवळ प्रतिवादी क्र.४ च्या हक्काची योग्य ती चौकशी करून त्याचा हक्क ठरविण्याकरिता पुनर्निर्णीत करण्याकरिता पाठविण्यात आला असून त्यामध्ये वादीस कोणतीही दुरूस्ती करण्याचा आदेश नाही. वादी खोटे अर्ज देवून चौकशी लांबवित आहे. सबब वादीचा अर्ज रदद करण्यात यावा.

३. वादी आणि विधिज्ञ यांचे युक्तीवाद ऐकले असता आणि अभिलेखावरील पुरावा पाहता खालील प्रश्न माझयासमोर आले. त्यांची उत्तरे मी त्याखाली लिहीलेल्या कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | वादी कथन करतो त्याप्रमाणे दावा दुरूस्त होवून मिळण्यास तो पात्र आहे काय ? | होय. |
| २. | काय आदेश दयावा? | अर्ज मंजुर करण्यात आला. |

### पुरावा

४. वादींनी निशाणी २२९ कडे त्याचे स्वत:चे प्रतिज्ञापत्र दाखल केले असून प्रस्तुत अर्जासमवेत मौजे पळसखेडे ता. संगमनेर येथील फेरफार क्रमांक २४०३ दाखल केला आहे. याउलट, प्रतिवादींनी कोणताही पुरावा कागदपत्रे दाखल केली नाही.

<u>कारणमिमांसा</u>

<u>**मुददा क. १ करिता**</u> –

५. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले, सदरचा दावा वादीने प्रस्तुतचा अविभक्त हिंदु कुटूंबाचा असणा-या मिळकतीतील त्याचा हिस्सा ठरवुन मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादींनी महसुल अधिकारी यांच्याकडून दावा मिळकतीचे वाटप करून घेतले नंतर प्रतिवादी क. २ याने दावा मिळकतीतील काही भाग ति-हाईत इसम शरद चंद्रभान गाडेकर यांस विक्री केला आहे. दाव्याचे कामकाज सदयस्थितीमध्ये चालू आहे. प्रस्तुत दावा वरिष्ठ न्यायालयाकडून पुनर्निर्णीत करण्याकरिता पाठविण्यात आला आहे. सदयस्थितीमध्ये दावा चालू असताना दावा मिळकतीची विक्री प्रतिवादी क. २ यांनी केली आहे. सबब वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये असणा-या वादाचे समुळ निराकरण करण्याकरिता वादी कथन करतो त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करणे गरजेचे झाले आहे. <u>***विनायक धर्मा सावंत वि. अ‍ॅटोनियो जोस लोको (१९९९(२) बी.सी.जे. ३४५)***</u> मध्ये न्यायनिर्णया देताना मा. उच्च न्यायालयाने असे अभिनिर्धारीत केले आहे की, *It would not amount to introducing any new case- Such clarification would be certainly of great assistance to the trial court to decide the entire dispute by proper adjudication grant of amendment was proper and valid.* प्रस्तुत दाव्याचा विचार करता दावा चालू असताना वादी कथन करतो त्याप्रमाणे दावा मिळकतीचे हस्तांतरण झाले आहे ही बाब प्रतिवादी यांनी मान्य केली आहे. सबब दावा चालू असताना मिळकतीचे हस्तांतरण झाले आहे ही बाब समोर येत आहे. वादी कथन करतो त्याप्रमाणे दुरूस्ती करण्याची परवानगी न दिल्यास त्याची परिणिती ही उभय पक्षातील वादाचे समुळ निराकरण होण्यात होणार नाही. सबब वादीचा अर्ज नामंजुर केल्यास नवीन दाव्याच्या निर्मीतीची दाट शक्यता समोर येते.

६. अशाप्रकारे दुरूस्ती दाव्यामध्ये केल्यास प्रतिवादींची काही अंशी गैरसोय होत आहे. त्याअनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालय, यांच्या <u>***Indian Card Clothing Company Ltd., V/s Shaw Wallace and Company Ltd., 2000(1)Mah.,L.R.523.***</u> न्यायानिर्णयाचे अवलोकन करणे मला गरजेचे वाटते ज्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे अभिनिर्धारीत केले आहे की, *The amendment generally shall be allowed as it is necessary to decide real controversy between the parties to the suit. Therefore, the plaintiff shall not be deprived of carrying out amendments to the pleadings, inconvenience caused to defendants can be compensated in terms of cost.* सबब एकंदरीत चर्चेवरून ही बाब प्रकर्षाने समोर येते की, वादी कथन करतो त्याप्रमाणे दाव्याचे कामी आवश्यक ती वस्तुस्थिती दाव्यात दुरूस्ती करून अभिलेखावर आणणे आवश्यक झाले आहे हे जरी खरे असले तरी त्यानुसार प्रतिवादी यांना ज्या गैरसोईचा सामना करावा लागणार आहे त्याबाबत त्यांना कॉस्ट मिळणेही न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. सबब दाव्याच्या या स्थितीला वादी कथन करतो त्याप्रमाणे दुरूस्तीची परवानगी देणे आवश्यक झाले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम २ प्रमाणे दाव्यातील कथनांमध्ये संपुर्ण कथने समाविष्ट करणे

आवश्यक असते. त्यामुळे वादीस प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरूस्त करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे व तसे न झाल्यास वादीचे नुकसान होईल. सबब वादी कथन करतो त्याप्रमाणे दावा दुरूस्त करण्यास परवानगी देणे क्रमप्राप्त ठरते. सबब मी मुददा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुददा क. २ करिता –**

७. मुददा क्र. १ च्या चर्चेमध्ये आणि अभिलेखावर आलेला एकंदरीत पुराव्याचे अनुषंगाने वादीस प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरूस्त करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे व तसे न झाल्यास वादीचे नुकसान होईल. उलटपक्षी वादीचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांस कोणतीही हानी पोहचत नाही. सबब मुददा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा अर्ज खर्च रक्कम रूपये १०००/- सह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे योग्य ती दुरूस्ती मुळ दाव्याकामी मुदतीच्या आत करावी व दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करून ती प्रतिवादीस पुरविण्यात यावी.

३. वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना दयावी.

(पी. आय. मोकाशी)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
संगमनेर.

दिनांक : १९/०७/२०१७.